# Symbolization

1. सीता आणि राम हुशार आहेत (S,R)
2. सचिन किंवा राहुल खेळेल. (S.R)
3. जर पाऊस पडला तर पिके येतील (P,Q)
4. गणेश आला तर आणि तरच रमेश येईल (G.R)
5. राधा हुशार नाही (R)
6. असे नाही की लातूर शहर नाही (L)
7. सेवेने किंवा दानाने कीर्ति मिळवता येते. (S.D)
8. जर सीतेने लक्ष्मणरेषा ओलांडली नसती, तर रामायण घडले नसते. (S.R)
9. जर शेतीचे नुकसान झाले तरच नुकसान भरपाई मिळेल. (F,G)
10. सचिन फलंदाज नाही असे नाही (S)
11. जर तुझे केस काळेभोर असतील आणि डोळे मोठे असतील तर मी तुझ्याशी लग्न करेन. (P,Q,R)
12. जर तुझे केस काळेभोर असतील आणि डोळे मोठे असतील तरच मी तुझ्याशी लग्न करेन आणि संसार करेन. (P,Q,R,S)
13. सचिन फलंदाज आहे आणि हरभजन गोलंदाज आहे (S,H)
14. रोहित फलंदाज आहे पण गोलंदाज नाही. (F,G)
15. पक्षी उंच उडतो किंवा झाडावर बसतो. (H.T)
16. नीतीन हुशार आहे पण मेहनती नाही (N,A)
17. जर लिटमस पेपर तांबडा झाला तर द्रव्य आम्ल असेल किंवा काही तरी चुकले असेल. (R,A,W)
18. तुम्ही पैसे गमावले पण प्रतिष्ठा कमवली. (L,S)
19. आज रविवार असेल आणि उद्या सोमवार असेल तर परवा गुरुवार असणार नाही. (S,M,T)
20. मी मुंबई किंवा पुण्याला जाणार नाही. (M,P)
21. जर सीमा आणि उमा कॉलेजला आल्या तर आणि तरच राधा आणि कमला देखील येतील. (S,U,R,K)
22. मुलगा श्रीमंत नाही पण हुशार व मेहनती आहे. (R,H,I)
23. जर तुम्ही मेहनत केली तरच यशस्वी व्हाल. (W,S)
24. मुंबई आणि नागपूर महाराष्ट्रातील महानगरे आहेत. (M,N)
25. आज रविवार नाही. (S)

26. जर सीमा व उमा कॉलेजला आल्या तर राधा आणि कमला येणार नाहीत. (S,U,R,K)

27. जर प्रदीपला कॅन्सर झाला तर त्याचा मृत्यू होईल व स्वकीयांना दुःख होईल. (C,D,S)

28. असे नाही की तर्कशास्त्र हे शास्त्र नाही. (L)

29. असे नाही की माझी इच्छा आहे. (W)

30. जर मी सेट किंवा नेट झालो तरच प्राध्यापक होईन. (S,N,P)

31. कारगील युद्ध थांबेल किंवा थांबणार नाही. (K)

32. अमेरिकेने इस्त्राईलला मदत केली नाही तर त्याचा सर्वनाश होईल (A,I)

33. जर मी नोकरीस लागलो नाही तर माझे कुटुंब सुखी होणार नाही. (T,H)

34. चित्र आकर्षक नाही किंवा टाकाऊ पण नाही. (A,V)

35. तो काळा आहे पण दाक्षिण भारतीय नाही. (B,S)

36. तू तिकिट घेतले नाहीस तर तुला चित्रपट पाहता येणार नाही (T,P)

37. जर सदाफुलीचे झाड लावले तर फुले लवकर येतील, जर गुलाबाचे झाड लावले तर फुले उशीरा येतील. (S,E,R,L)

38. जर त्याने कलाशाखेत प्रवेश घेतला तर तो तत्त्वज्ञान घेईल किंवा मानसशास्त्र घेईल (A,P,S)

39. जर वेळेवर पाऊस पडला तर पीक उत्तम येईल आणि लोक सुखी होतील. (R,H,P)

40. जर तो अभ्यास करेल तर उत्तीर्ण होईल, पण तो अभ्यास करणार नसेल तर अनुत्तीर्ण होईल. (S,P,F)

41. कार्ल मार्क्स साम्यवादी नव्हता हे खरे नाही. (C)

42. जर तो वेळेवर आला तर त्याची गाडी चुकणार नाही. (C,M)

43. थंडी खुप होती, तरीपण बाहेर जाऊन मजा लुटायची ठरवले (C,O,E)

44. जर अमोल वर्गप्रतिनिधी म्हणून निवडून आला तर बळवंत उपाध्यक्ष होईल आणि गणेश खजिनदार होईल. पण सुरेशला कोणतेच पद मिळणार नाही. (A,B,G,S)

45. जर श्रीकांत जिंकला तर अनिल आणि अभिजीत यांचीही जीत होईल. (S,A,B)

46. इंग्लंडला प्रथम पुरस्कार मिळाला तर फ्रान्स दुसऱ्या क्रमांकावर राहिल किंवा अमेरिका दुखावेल, पण भारताला काहीही फरक पडणार नाही. (E, F, A, I)

47. बीजगणित किंवा भूमिती आवश्यक असेल तर विद्यार्थी गणिताचा अभ्यास करतील पण भाषेचा अभ्यास करणार नाहीत. (A, G, M, L)

48. जर वस्तुंची दुर्मिळता वाढली तर किंमती वाढतील, पण जर सरकार बदलले तर आर्थिक नियंत्रण राहणार नाही (S, P, C, F)

49. जर तपास सुरु राहिला तर नवीन पुरावा उजेडात येईल आणि जर नवीन पुरावा उजेडात आला तर प्रतिष्ठित नागरिक दोषी ठरतील. (C, N, I)

50. टॉमला निरोप मिळाला तर तो विमानाने येईल. पण तो विमानाने नाही आला तर कार्यक्रम चुकेल. (M, P, R)

51. जोपर्यंत मला नोकरी मिळणार नाही तोपर्यंत माझे कुटुंब सुखी होणार नाही. (J, H)

52. गोविंद कावीळीने मेला. तो क्षयरोगाने मेला नाही. (J, T)

~ → Not, Negation → नाही, असे नाही की
• → And → आणि, व, पण, परंतु,
⊃ → Implies → जर - तर, जोपर्यंत - तोपर्यंत.
V → Or → किंवा, अथवा.
≡ → Equivalance → जर आणि जरच, तर आणि तरच.